लशीच्या साठ्याची महापौरांकडून पाहणी

मुंबई : मुंबई महापलिकेची लसीकरणाची तयारी पूर्ण झाली असून मुंबईत १६ जानेवारीला लसीकरणाला सुरुवात होणार आहे. पंधरापैकी नऊ लसीकरण केंद्रांमध्ये सराव फेरी घेण्यात आली असून उर्वरित सहा ठिकाणी १५ जानेवारीला सराव फेरी होईल. 'कोव्हिशिल्ड' या लसीचा पहिला साठा बुधवारी सकाळी पालिकेच्या एफ/ दक्षिण विभागातील साठवणूक केंद्रात दाखल झाला असून या साठवणूक केंद्राची महापौर किशोरी पेडणेकर व अतिरिक्त महापालिका आयुक्त सुरेश काकाणी यांनी पाहणी केली.

हत्या प्रकरणातील आरोपी अटकेत

मुंबई : दारूच्या नशेत पत्नीची हत्या करून पसार झालेल्या मजुराला गुन्हे शाखेच्या पथकाने पुण्यातून अटक केली. शिबू भौमिक असे या मजुराचे नाव आहे. वरळीतील माया नगर भागातील लेबर कॅम्पमध्ये त्याने गळा दाबून आणि धारदार हत्याराने कपाळावर वार करून पत्नीची हत्या केली होती. शिबू हा मूळचा पश्चिम बंगाल येथील रहिवासी आहे. शिखा ही त्याची दुसरी पत्नी होती. कौटुंबिक वादामुळे त्याने दारूच्या नशेत २४ डिसेंबरला शिखाची हत्या केली.

राज्याला लशींचा अपुरा पुरवठा!

आणखी सात लाख ८७ हजार कुप्यांची आरोग्य विभागाची केंद्राकडे मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : करोनाच्या पहिल्या टप्प्यातील लसीकरणासाठी राज्यात सुमारे १७ लाख ५० हजार कुप्यांची आवश्यकता आहे. परंतु केंद्राने केवळ ९ लाख ८३ हजार कुप्या दिल्या असून. हा साठा अपुरा आहे. पहिला टप्पा पूर्ण करण्यासाठी राज्याला आणखी ७ लाख ८७ हजार कुप्यांची आवश्यकता असून त्यांचा पुरवठा करण्याची मागणी आरोग्य विभागाने केंद्राकडे केली आहे.

राज्यात लसीकरणासाठी सुमारे आठ लाख आरोग्य कर्मचाऱ्यांची नोंदणी झाली आहे. एका व्यक्तीला २८ दिवसांच्या अंतराने लशीच्या दोन मात्रा देणे आवश्यक आहे. तसेच कुप्यांमध्ये काही त्रुटी किंवा अन्य काही अडचणी असण्याची शक्यता असते. त्यामुळे अतिरिक्त १० टक्के साठा दिला जातो. यानुसार केंद्राकडून राज्याला १७ लाख ५० हजार कुप्या येणे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात 'कोव्हिशिल्ड'च्या ९ लाख ६३ हजार आणि 'कोव्हॅक्सीन'च्या २० हजार अशा एकत्रित ९ लाख ८३ हजार कुप्या प्राप्त झाल्या आहेत.

'हा साठा पुरेसा नाही. आरोग्य कर्मचाऱ्यांना मोफत लस देण्याची संपूर्ण जबाबदारी केंद्राची आहे. त्यामुळे आणखी कुप्या पुरविण्याची मागणी केंद्रीय आरोग्य विभागाकडे केली आहे. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळेल आणि पुढील काही दिवसांत आणखी साठा राज्याला येईल', असे मत आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी व्यक्त केले.

'मुंबईत १ लाख ३० हजार कर्मचाऱ्यांची नोंदणी झाली असून याच्या दुप्पट म्हणजे सुमारे २ लाख ६० हजारांहून अधिक साठा येणे अपेक्षित होते. परंतु पहिल्या टप्प्यात १ लाख ३९ हजार ५०० कुप्या प्राप्त झाल्या आहेत. एका व्यक्तीला एका प्रकारच्या लशीची पहिली मात्रा दिल्यानंतर दुसरी मात्राही त्याच लशीची देणे आवश्यक आहे. तसेच पुढील टप्प्यात येणारी लस याच कंपनीची असेल याची शाश्वती नाही. त्यामुळे नियोजन करतानाच एका व्यक्तीला दोन मात्रा यानुसार लसीकरणाचे सत्र आयोजित करावे लागेल. उपलब्ध लशीमध्ये मुंबईतील १ लाख ३० हजार कर्मचाऱ्यांपैकी ६० हजार जणांना लसीकरण शक्य आहे. उर्वरित ७० हजारांचे लसीकरण लशींचा साठा आल्यानंतरच करता येईल', असे पालिकेच्या मुख्य कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. मंगला गोमारे यांनी सांगितले.

शनिवारी राज्यातील ५११ केंद्रांवर लसीकरण सुरू होणार होते. परंतु या केंद्रांची संख्या कमी करण्याची सूचनाही केंद्राने राज्याला दिली आहे. त्यामुळे आता ५११ ऐवजी ३५८ केंद्रांवर शनिवारी लसीकरण केले जाणार आहे. यात सर्वाधिक केंद्रे मुंबईत (५०) असून त्यापाठोपाठ पुणे (३९), ठाणे (२९) या शहरांमध्ये लसीकरणाची सोय करण्यात आली आहे. मुंबईसाठी १ लाख ३९ हजार ५००, तर पुण्यासाठी १ लाख १३ हजार कुप्यांचे वितरण केले आहे, अशी माहिती आरोग्यमंत्र्यांनी दिली.

केंद्राचे म्हणणे...

आवश्यकतेपेक्षा राज्याला कमी कुप्या मिळाल्याचे वक्तव्य आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी केले असून याला केंद्रीय आरोग्य विभागाने ट्विटरच्या माध्यमातून प्रत्युत्तर दिले आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार 'कोव्हिशिल्ड' आणि 'कोव्हॅक्सीन' लशीच्या पहिल्या टप्प्यात १ कोटी ६५ हजार कुप्या खरेदी केल्या असून त्यांचे वाटप सर्व राज्यांना केले असल्याचे यात म्हटले आहे.



छाया - दीपक जोशी

उद्घाटन कार्यक्रम मुंबई आणि जालन्यात

जालना जिल्हा रुग्णालय आणि मुंबईतील कूपर रुग्णालय या दोन ठिकाणी शनिवारी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून लसीकरणाचा उद्घाटन कार्यक्रम होणार असून पंतप्रधान संवाद साधणार आहेत.

लस वापराच्या निकषांबाबत अस्पष्टता

नियमावली जाहीर करण्याची मागणी

शैलजा तिवले, लोकसत्ता

मुंबई : राज्याला लस प्राप्त झाली असली, तरी तिच्या वापराच्या निकषांबाबत कोणत्याही सूचना केंद्रीय किंवा राज्य स्तरावरून लसीकरण केंद्रांना प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे ही लस कोणाला द्यावी आणि कोणाला देऊ नये, याबाबत अस्पष्टता असून नियमावली जाहीर करण्याची मागणी केली जात आहे.

राज्यात 'कोविशिल्ड' आणि 'कोव्हॅक्सीन' या दोन लशी प्राप्त झाल्या आहेत. पहिल्या टप्प्यात राज्यातील ३५८ केंद्रावर आरोग्य कर्मचाऱ्यांचे लसीकरण करण्यात येणार आहे. परंतु ही लस देण्याचे काय निकष असावेत. अनियंत्रित सहव्याधी असल्यास किंवा अन्य कोणती औषधे सुरू असल्यास ही लस देता येईल का, याबाबत अद्याप कोणत्याही सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच पहिल्या मात्रेनंतर पुढील मात्रा कधी आणि कशी द्यावी याची माहिती अजून मिळालेली नाही, असे औरंगाबाद महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

लस देण्याआधी किती दिवस ताप आल्यास देऊ नये, अन्य कोणती आजाराची लक्षणे असल्यास लस दिली तर चालेल का, असे अनेक प्रश्न सध्या अनुत्तरित आहेत. येत्या दोन दिवसांत याबाबत माहिती मिळण्याची शक्यता आहे. परंतु ही माहिती नियमावली स्वरुपात आल्यास सर्व ठिकाणी योग्य रितीने पोहचविणे सोपे होईल, असे आरोग्य आयुक्तालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.



शंकानिरसनाची गरज

लशीचा वापर केल्यास होणारे फायदे, लशीची सुरक्षितता, लसीकरणाची गरज इत्यादी बाबत आरोग्य कर्मचाऱ्यांसह अनेक गटांमध्ये शंका आहेत. तेव्हा याची योग्य माहिती पोहचणे आणि लसीकरणाबाबत जनजागृती करण्यावर भर देणे आवश्यक असल्याचे मुंबई पालिकेच्या विभागीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी अधोरेखित केले.

'कोव्हॅक्सीन'च्या वापराबाबत संभ्रम

- 'कोव्हॅक्सीन' लशीचा वापर तिसऱ्या टप्प्यातील चाचण्याअंतर्गत केला जाणार आहे. त्यामुळे चाचण्यांसाठी लागू असणारे सर्व नियम तेव्हा लसीकरणासाठी लागू असणार आहेत का, याबाबतही अजून संभ्रम असल्याचे आयुक्तालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.
- केंद्रीय आरोग्य विभागासोबत बैठका सुरू असून पुढील दोन दिवसांत याबाबत अधिक स्पष्टता येईल. त्यानुसार आरोग्य केंद्राना माहिती दिली जाईल, असे आरोग्य विभागाचे प्रमुख सचिव डॉ. प्रदीप व्यास यांनी सांगितले.

देशभरातील २२ ठिकाणी 'कोव्हिशिल्ड'च्या कुप्या रवाना

मुंबई : येत्या शनिवारपासून पहिल्या टप्प्यातील लसीकरणाला सुरुवात होणार असून, 'कोव्हिशिल्ड' लशीच्या कुप्या देशभरात पाठविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून देशातील २२ ठिकाणी लशीच्या कुप्या पाठविण्यात आल्याची माहिती विमानतळ प्रशासनाकडून देण्यात आली.

मुंबई विमानतळावरून जवळपास २ लाख ७२ हजार ४०० कुप्या विविध ठिकाणी रवाना करण्यात



आल्या. गोवा, बागडोग्रा, राजकोट, रांची, इम्फाळ, आगरतळा, कोचिन, भोपाळ, कानपूर, जम्मू, श्रीनगर, लखनौ, चंदीगड, गोरखपूर, रायपूर, देहरादून, वाराणसी, इंदौर, त्रिवेंद्रम आणि जबलपूर येथे हवाईमार्गे लशीचा साठा पोहोचवण्यात आला.

मुंबई विमानतळावरून दोन खोके लशीचा साठा घेऊन बुधवारी पहाटे ५.२० वाजता पहिले विमान गोव्याच्या दिशेने झेपावले. त्यानंतर सकाळी ६ वाजता सात खोक्यांसह राजकोटच्या दिशेने दुसऱ्या विमानाने उड्डाण केल्याचे विमानतळ प्रशासनाने सांगितले.

रायपूर आणि कोचिन येथे २७ आणि २५ लशीच्या कुपीचे खोके पाठविण्यात आले. लशीच्या साठ्याची वाहतूक योग्य प्रकारे होण्यासाठी विमानतळ प्रशासनाने कृतिदल तैनात केले आहे.

मुंबईतील एकूण बाधितांची संख्या तीन लाखांवर

दिवसभरात ६७५ नवे रुग्ण, आठ जणांचा मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबईतील एकूण करोनाबाधितांची संख्या तीन लाखांच्या पुढे गेली आहे. दैनंदिन रुग्णसंख्या कमी होत असली तरी आतापर्यंत एकूण तीन लाख मुंबईकरांना करोनाची बाधा होऊन गेल्याचे अधिकृत आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. दरम्यान, मुंबईत बुधवारी ६७५ नवीन रुग्णांची नोंद झाली असून ८ रुग्णांचा मृत्यू झाला.

मुंबईतील रुग्ण वाढीचा सरासरी दर ०.२१ टक्क्यावर स्थिर आहे. तर रुग्ण दुपटीचा सरासरी कालावधी ३७१ दिवसांपर्यंत म्हणजे सुमारे एक वर्षाहून अधिक झाला आहे. लक्षणेविरहित रुग्णांची संख्या अधिक आहे.

मुंबईतील विविध रुग्णालयांमध्ये दाखल ५३१ रुग्ण बरे झाले असून त्यांना रुग्णालयातून घरी पाठविण्यात आले. त्यामुळे आतापर्यंत दोन लाख ८० हजारांहून अधिक म्हणजेच ९३ टक्के रुग्ण करोनामुक्त झाले आहेत.

स्थिती अशी...

बुधवारी ८ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली. त्यात ३ पुरुष आणि ५ महिलांचा समावेश होता. गेल्या नऊ महिन्यांत करोनामुळे दगावलेल्यांची एकूण संख्या ११ हजार २१० वर पोहोचली आहे. उपचाराधीन रुग्णांपैकी सुमारे चार हजार रुग्णांना लक्षणे नाहीत, तर केवळ अडीच हजार रुग्णांना लक्षणे आहेत. साडेचारशे रुग्णांची प्रकृती गंभीर आहे.

राज्यात ३,५५६ नवे रुग्ण

राज्यात गेल्या २४ तासांत ३,५५६ करोनाबाधित आढळले, तर ७० जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे एकूण बाधितांची संख्या १९ लाख ७८ हजार, तर मृत्यूसंख्या ५० हजार २२१ इतकी झाली आहे. दिवसभरात पुणे शहर ३२८, नाशिक शहर १०६, पिंपरी-चिंचवड १५२, उर्वरित पुणे जिल्हा २०८, नागपूर ३११ रुग्ण आढळले.

ठाणे जिल्ह्यात ४१३ नवे रुग्ण

ठाणे : ठाणे जिल्ह्यात बुधवारी ४१३ करोनाबाधित आढळले, तर चार जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे एकूण बाधितांचा आकडा २ लाख ४८ हजार १७०, तर मृतांची संख्या ६ हजार ४२ झाली आहे.

बुधवारी ठाणे महापालिका क्षेत्रात १२१, कल्याण डोंबिवलीत ११३, नवी मुंबईत ८०, मीरा भाईंदर ३७, ठाणे ग्रामीण क्षेत्रात २५, बदलापूर १६, अंबरनाथ ११, उल्हासनगर पाच आणि भिवंडीतील पाच रुग्ण आढळले. मृतांमध्ये ठाण्यातील दोन, नवी मुंबई आणि मीरा भाईंदरमधील प्रत्येकी एका रुग्णाचा सामावेश आहे.

तारापूरमधील २२५ कारखान्यांवर संक्रांत

सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रावर प्रदूषण नियंत्रण मंडळाची कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

पालघर : तारापूर औद्योगिक वसाहतीमधील सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राकडून ('सीईटीपी') कार्यक्षमतेने प्रक्रिया होत नसल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळाने संबंधित केंद्र बंद करण्याचे आदेश दिले आहेत. या केंद्राशी संलग्न २२५ उद्योगांवर या आदेशाचा परिणाम होणार आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'एएम-२९' या प्लॉटमध्ये असलेल्या जुन्या सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राला २९ नोव्हेंबर २०१९ रोजी प्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी सशर्त परवानगी देण्यात आली. तसेच नव्याने उभारण्यात येणाऱ्या ५० दशलक्ष घनमीटर क्षमतेच्या सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील २५ दशलक्ष घनमीटर क्षमतेच्या टप्प्यालाही प्रक्रिया सुरू करण्याची परवानगी देण्यात आली.

परंतु, जुन्या सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात मंडळाने नेमून दिलेल्या सांडपाणी नियम व निकषांचे उल्लंघन होत असल्याचे, तसेच मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात सीओडी (केमिकल ऑक्सिजन डिमांड)चे पाणी समुद्रात सोडले जात असल्याचे २२ नोव्हेंबर २०२० रोजी घेतलेल्या सांडपाण्याच्या नमुन्यात दिसून आले होते.

राष्ट्रीय हरित लवाद व सर्वोच्च न्यायालयाकडे दाखल करण्यात आलेल्या याचिकांच्या अनुषंगाने पर्यावरण रक्षणाबाबत आवश्यक ती खबरदारी घेतली जात नाही. तसेच सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील पहिल्या टप्प्यात अपेक्षित कार्यक्षमता प्राप्त झाली नसल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मत आहे. उद्योगांकडून प्रदूषित पाणी सोडण्यात येत असल्याने खाडी क्षेत्रातील पर्यावरणाला हानी पोहोचत आहे. जुन्या सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे नूतनीकरण २६ नोव्हेंबरपासून सुरू झाल्यानंतर त्या प्रकल्पाशी संलग्न उद्योगांनी त्यांकडून सांडपाणीनिर्मिती बंद करण्याचे नियोजित करणे आवश्यक असताना त्याचे उल्लंघन झाल्याचे दिसून आल्याचे आदेशात म्हटले आहे.

आदेशात काय?

- औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांकडून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याच्या दर्जावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी संगणकीकृत ऑनलाइन यंत्रणा बसवणे बंधनकारक करण्यात आले होते, मात्र त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे आदेशात अधोरेखित करण्यात आले आहे.
- तसेच जुन्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील सुधारणा केलेल्या पहिल्या टप्प्यातून होणाऱ्या पाण्याचा प्रक्रियेच्या दर्जामध्ये अपेक्षित सुधारणा होत नसल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाने संपूर्ण जुनी 'सीईटीपी' बंद करण्याचे आदेश काढताना म्हटले आहे.
- या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी राजेंद्र राजपूत यांनी सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र बंद करण्याचे आदेश १२ जानेवारी रोजी जारी केले. तसेच या केंद्रात कोणत्याही प्रकारचे सांडपाणी न स्वीकारण्याच्या सूचना दिल्या आहेत.
- परिणामी या प्रकल्पाशी जोडलेल्या २२५ हून अधिक उद्योगांना त्यांचे उत्पादन बंद ठेवावे लागणार आहे. जुन्या 'सीईटीपी'मध्ये सुधारणा होईपर्यंत किंवा या उद्योगांची नव्या 'सीईटीपी'शी जोडणी होईपर्यंत या उद्योगांवर संक्रांत ओढवली आहे.

"जुन्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रात सुधारणा करण्यासाठी नोव्हेंबरअखेरीपासून केंद्र बंद करण्यात आले. त्यामुळे या केंद्राशी निगडित सर्व उद्योग बंद ठेवण्यात आले होते. उद्योगातील शौचालय व मानवी वापरातून निघणारे सांडपाणी 'सीईटीपी'मध्ये येत असल्याने त्यावर प्रदूषण नियंत्रण मंडळाने आक्षेप नोंदवला आहे. नवीन २७ दशलक्ष घनलिटर प्रतिदिन क्षमतेचा 'सीईटीपी' तारापूरच्या ओएस ३० प्लॉटमध्ये कार्यरत असून या ठिकाणी ११ दशलक्ष घनमीटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. उर्वरित उद्योगांमधील सांडपाणी नवीन 'सीईटीपी'सोबत जोडणी करण्यास एमआयडीसी असमर्थ ठरल्याने येथील दोनशे ते अडीचशे उद्योगांना या आदेशाचा फटका बसणार आहे.

– डी.के. राऊत, अध्यक्ष टीमा (उद्योजकांची संस्था)

TATA
टाटा पॉवर
दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय :
बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई-४०० ००१.
टेलि.: ९१ २२ ६६६५ ८२८२ फॅक्स : ९१ २२ ६६६५ ८८०१
सीआयएन : एल२८९२०एमएच१९१९पीएलसी०००५६७
ईमेल : tatapower@tatapower.com संकेतस्थळ : www.tatapower.com

अभिलेख तारखेची सूचना

कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ च्या अनुसार याद्वारा सूचना देण्यात येते की, शनिवार, ०६ फेब्रुवारी २०२१ ही तारीख खालीलबाबत प्रदानाच्या हेतूकरिता अभिलेख तारीख म्हणून निश्चित करण्यात आली आहे.

i. अपरिवर्तनीय ऋणपत्रांच्या स्वरूपातील ९% सीरिज I असुरक्षित अपरिवर्तनीय विमोचनीय करयोग्य सूचिबद्ध दरातील कर्जरोखे (आयएसआयएन : आयएनई२४५ए०८१४१)
ii. अपरिवर्तनीय ऋणपत्रांच्या स्वरूपातील ८.८४% सीरिज III असुरक्षित अपरिवर्तनीय विमोचनीय करयोग्य सूचिबद्ध दरातील कर्जरोखे (आयएसआयएन : आयएनई२४५ए०८१६६), दोन्हीकरिता नियत तारीख २२ फेब्रुवारी २०२१ आहे.

दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेडकरिता
एच. एम. मिस्त्री
कंपनी सचिव
(एफसीएस : ३६०६)

स्थळ : मुंबई
तारीख : १३ जानेवारी २०२१

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरींग कॉर्पोरेशन लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३.
सीआयएन: U74999MH2008PLC185349;
ईमेल: ig-mcxccl@mcxccl.com
संकेतस्थळ: https://www.mcxccl.com

सूचना

सिक्युरिटीज् कॉन्ट्रॅक्टस् (रेग्युलेशन) (स्टॉक एक्स्चेंजेस अँड क्लिअरींग कॉर्पोरेशन्स) रेग्युलेशन्स, २०१८, च्या नियम ३३ आणि सेबी (लिस्टींग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५, च्या नियम ४७ च्या अनुरोधाने सूचित करण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक **गुरुवार, दिनांक २१ जानेवारी २०२१ रोजी मुंबई** येथे, *इतर विषयांबरोबर*, कंपनीच्या ३१ डिसेंबर २०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊमाही करीता अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे व मंजूर करणे यासाठी घेण्यात येणार आहे.

उल्लेखित सूचना, कंपनीचे संकेतस्थळ **https://www.mcxccl.com/disclosures/announcement** वर उपलब्ध आहे.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज
क्लिअरींग कॉर्पोरेशन लिमिटेड करीता
मंदार कुलकर्णी
कंपनी सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक: जानेवारी १३, २०२१

ADMISSION NOTICE FOR ACADEMIC SESSION 2020-2021
Late Bhausaheb Hiray S.S.Trust's Institute of Computer Application
341, Next to English High school, Bandra (E), Mumbai- 400051
DTE Code 3169

All types of candidates aspiring for admission under CAP seats, it is mandatory to get register online on Cet Cell website and get documents verified and confirmed at scrutiny centre.
As per the Rule No. 3 & 13 of the notified rules, candidates aspiring for admission for Institutional Quota, Vacant seats after cap it is perquisite & **mandatory to get documents verified and confirmed at scrutiny centre.**
Only those candidates who have verified and confirmed documents at scrutiny centre and having **Cap Merits Number** shall be eligible for admission for all types seats/ quota.
For MCA Post Graduate Course
Recognized by Government of Maharashtra
Affiliated to University of Mumbai &
Approved by AICTE, New Delhi
Application should reach the undersigned as per following schedule sale and receipt of application form 18/01/2021 to 25/01/2021.
• No Fees for Application Form **DIRECTOR**

ADMISSION NOTICE FOR ACADEMIC SESSION 2020-2021
DR. BALIRAM HIRAY COLLEGE OF ARCHITECTURE
341, Next to English High school, Bandra (E), Mumbai- 400051
DTE Code 3248

All types of candidates aspiring for admission under CAP seats, it is mandatory to get register online on Cet Cell website and get documents verified and confirmed at scrutiny centre.
As per the Rule No. 3 & 13 of the notified rules, candidates aspiring for admission for Institutional Quota, Vacant seats after cap it is perquisite & **mandatory to get documents verified and confirmed at scrutiny centre.**
Only those candidates who have verified and confirmed documents at scrutiny centre and having **Cap Merits Number** shall be eligible for admission for all types' seats/ quota.
For B.Arch Degree & M.Arch Post Graduate Course
Recognized by Government of Maharashtra
Affiliated to University of Mumbai &
Approved by Council of Architecture, New Delhi
Application should reach the undersigned as per following schedule sale and receipt of application form 18/01/2021 to 25/01/2021.
• No Fees for Application Form **PRINCIPAL**

पद्मावती वायर ॲण्ड केबल्स प्रायव्हेट लिमिटेड
परिसमापकांचा पत्ता- ७०२, जानकी सेंटर, दत्ताजी साळवी रोड, ऑफ वीरा देसाई रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई-४०००५३
संपर्क : +९१ ९०८२१५६२०८; ई-मेल : irp.pwcpl@gmail.com

इनसोलव्हन्सी ॲण्ड बँकरप्सी कोड, २०१६ अंतर्गत ई-लिलाव
लिलावाचा दिनांक आणि वेळ : ३० जानेवारी २०२१ (शनिवार) रोजी सकाळी ११.०० वा.पासून दुपारी १.०० वा.पर्यंत (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

परिसमापन नियमावलीच्या नियमावली ३३ सह वाचल्या जाणाऱ्या आयबीसी, २०१६ च्या कलम ३५ (एफ) अंतर्गत पद्मावती वायर ॲण्ड केबल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या संपत्तीची विक्री. ई-लिलावाचे आयोजन "जे आहे जेथे आहे, जे आहे जसे आहे, जसे आहे तसे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय" आयोजित करण्यात आली आहे.
निम्नस्वाक्षरीकार यांच्याद्वारे ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. ई-प्रोक्यूरमेंट टेक्नोलॉजीस लिमिटेड- ऑक्शन टायगरद्वारे विक्री करण्यात येईल. **(रक्कम आयएनआरमध्ये)**

अ. क्र.	तपशील	क्षेत्र	राखीव मूल्य	इरठे रक्कम	बोली वाढविण्याची रक्कम
१	गट क्र. १९४, तानसा फार्म, गाव नरे, वाडा-भिवंडी रोड, तालुका- वाडा, जिल्हा- ठाणे.	२०,००० चौ.फू. (१९ आर ५२ पी)	७२,२४,५००	७,२२,४५०	२५,०००

पात्रता कागदपत्रांच्या सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ : २२ जानेवारी २०२१ (शुक्रवार)
माहिती देणे, साइट व्हिजिट, चर्चा बैठकीसाठी शेवटचा दिनांक : २८ जानेवारी २०२१ (गुरुवार)
इरठे सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक : २८ जानेवारी २०२१ (गुरुवार)
ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ : ३० जानेवारी २०२१ रोजी सकाळी ११.०० वा.पासून सायं. ०१.०० वा.पर्यंत.
टीप : तपशीलवार अटी आणि शर्ती, ई-लिलाव बोली कागदपत्रे, घोषणापत्र आणि ऑनलाइन लिलाव विक्रीचा अन्य तपशील https://ncltauction.auctiontiger.net वर उपलब्ध आहे.
कोणतेही स्पष्टीकरण हवे असल्यास कृपया निम्नस्वाक्षरीकार यांच्याशी irp.pwcpl@gmail.com वर संपर्क करा :

सही/ -
सीए अमित गुप्ता
पद्मावती वायर ॲण्ड केबल्स प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक
आदेश दिनांकित २२ फेब्रुवारी २०१४ नुसार
आयबीबीआय नोंदणीकरण : आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०००१६/२०१६-१७/१००४०
पत्ता : ७०२, जानकी सेंटर, दत्ताजी साळवी रोड,
दिनांक : १४ जानेवारी २०२१ ऑफ वीरा देसाई रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई-४०००५३
ठिकाण : मुंबई ई-मेल : irp.pwcpl@gmail.com

सत्यमेव जयते
सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम मंत्रालय
वैद्युतिक मापन उपयंत्र अभिकल्प संस्थान (IDEMI), मुंबई
राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ (NBCFDC) च्या अंतर्गत आयोजित कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

क्र	प्रशिक्षण कार्यक्रम	प्रवेश क्षमता	कालावधी	पात्रता	प्रशिक्षण पद्धती
१	Advance Web Designerand Animator	३०	६ महिने	१. उमेदवारचं किमान वय १८ वर्षपूर्ण असणं आवश्यक आहे. २. उमेदवार ओबीसी / ईबीसी / डीएनटी कैटेगरीतील असणं आवश्यक आहे. ३. किमान पात्रता १०+२ पास ४. ओबीसी उमेदवारासाठी कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न ३ लाखापेक्षा कमी आणि ईबीसी उमेदवारासाठी कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न १ लाखापेक्षा कमी असणं आवश्यक आहे	ऑनलाइन / ऑफलाइन (लॅपटॉप / डेस्कटॉप आवश्यक आहे)
२	Certificate Course in CNC Milling	३०	६ महिने		

स्टायपेंड -१०००/ - (दरमहा) (प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर दिले जाईल)
केवळ ओबीसी / ईबीसी / डीएनटी कामगारउमेदवारांसाठी
अर्ज www.idemi.org या वेबसाइट वर उपलब्ध आहे
आवश्यक कागदपत्रे: आधार कार्ड, जातिचा दाखला आणि दहावी / बारावी /आईटीआई/ डिप्लोमा / डिग्री मार्कशीट,ओबीसी आणि ईबीसी उमेदवारांसाठी उत्पन्नाचा दाखला
ॲनिमेशन विभाग : ९३७२८०२०१६ / ८८५०८५९२६६, सीएनसी विभाग : ७०२१२२१४९८ / ७०२१३६३०४३
अर्ज करण्याची अंतिम तारीख: २८ जानेवारी २०२१
वैद्युतिक मापन उपयंत्र अभिकल्प संस्थान (आईडीईएमआई), स्वातंत्र्यवीर तात्या टोपे मार्ग, चूनाभट्टी, सायन, मुंबई - ४०००२२.
ई-मेल: training@idemi.org idemicadcamtrg@gmail.com animation@idemi.org वेबसाइट: www.idemi.org
दूरध्वनी क्र. ०२२-२४०५०३०१/२/३/४ फ़ैक्स: ०२२-२४०५००१६

TENDER NOTICE
Tender for providing security services for MES Pune & Mumbai Campus

MES, Pune invites Sealed Tenders on **'Two Bid System'** from reputed Manpower Providing Agency / Firm having adequate experience in the field of providing security Services on contract basis.
The bids may be submitted in two separate envelopes duly super-scribed as **"Technical Bid"** and **"Financial Bid"**. Demand draft for Earnest Money Deposit of Rs. 50,000/- only in favour of **"Modern Education Society"** payable at Pune should be enclosed along with the Technical Bid. Both these bids should be put in one big envelope super-scribed **"TENDER FOR PROVIDING SECURITY SERVICES ON CONTRACT BASIS"**. The Bidder / Tenderer is requested to sign all the papers comprising Technical Bid, Financial Bid and all the Annexures attached.
The tender is liable to be rejected if any change in the terms and conditions is proposed.
Tenders without the Earnest Money Deposit (through Demand Draft Only) will be deemed rejected.

1	Issue of Tender Document	11.00 AM to 4.30 PM (Monday-Friday), at D.G. Ruparel College office, Senapati Bapat Marg, Mahalaxmi Sindhi Colony, Matunga (W), Mumbai-400016
2	Tender Document Fee (Non-refundable)	Rs. 1000/- DD in favour of Modern Education Society, payable at Pune
3	Last Date and Time for submission of Tender	21 January 2021 up to 4.00 PM.
4	Date and Time of opening of Technical Bid.	25 January 2021 at 11.00 AM
5	Date and Time of opening of Financial Bid	Will be intimated to Technically Qualified Bidders at a later date
6	Earnest Money Deposit (EMD)	Demand Draft only of Rs. 50,000/ (Rupees Fifty Thousand Only) to be placed in sealed Envelope of "Technical Bid"

Modern Education Society, Pune, reserves the right to reject all or any Tender without assigning any reason, whatsoever.
Secretary,
Modern Education Society, Pune

50 वर्षांची दमदार वाटचाल
DNS BANK
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
(मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)
अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वाला अर्थ मिळे।
: @7045456655 : 1800 233 1700



मकर संक्रांतीच्या सुमुहूर्तावर
सर्व प्रकारच्या UPI पेमेंटससाठी
DNSpay app
आपल्या सेवेत नि:शुल्क दाखल
DNSpay

- कोणत्याही ॲपद्वारे पैसे स्वीकारा.
- क्यु.आर.कोड स्कॅन करा व बिल पेमेंट करा.
- कोणत्याही बँकेतील खात्यांचे व्यवहार या ॲपद्वारे करा.
- प्ले स्टोअरवरुन DNSpay app डाऊनलोड करा आणि सहज सोप्या बँकींगचा आनंद घ्या.

DNSpay app लवकरच App Store वर
Web: www